REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# “ सर्वगुण संपन्न राम गणेश गडकरी यांचे सामाजिक जीवनात रूजविलेली मुल्ये”




कु.वंगारी गीता सदानंद
एम.ए.बी.एड., ( मराठी) सेट उत्तीर्ण 29 मे 2016

## प्रास्ताविक–

एखाद्या समस्येचा बारकाईने केलेला अभ्यास म्हणजे सं”ोधन होय.f”क्षणाच्या प्रक्रियेत अनेक समस्या निर्माण होतात. त्या समस्या दूर करण्यासाठी सं”ोधनाची आव”यकता असते.

वरिल संशोधन हा राम गणेश गडकरी यांच्या वैयक्तिक जीवनावर व त्यांच्या साहित्य लेखनावर आधारित आहे.तसेच त्यांनी सामाजिक जीवनात जी मुल्ये रूजविलेली आहेत त्यां मुल्यांचा ही अभ्यास आहे.जे साहित्य समाजासाठी खूप मोलाचे आहे.

## गोषवारा–

### अल्पसा परिचय

राम गणेश गडकरी

जन्म 26 मे 1885 मृत्यू 23 जानेवारी 1 9 19 हे

मराठी कवी नाटककार व महाराष्ट्रातील विनोदी लेखक.

मराठी साहित्यात नव्या युगात परिवर्तन करणारे राम गणेश गडकरी हे एक लेखक होते. त्यांनी ‘गोविंदाग्रज’ या नावाने कविता लिहिली. आणि ‘बाळकराम’ या नावाने विनोदी लेख लिहिले.

### वैयक्तिक जीवन

गडकरी यांचा जन्म 26 मे 1885 रोजी गुजरातच्या नवसारी जिल्ह्यातील गणदेवी गावात मराठी चंद्रसेनिया कायस्थ **प्रभ** कुटुंबात झाला. 23 जानेवारी 1 9 1 9 रोजी नागपूरजवळील सेव्हनर येथे त्यांचा मृत्यू झाला.

त्यांचे वडील गणेश रघुनाथ वासुदेव, गडकरी 24 सप्टेंबर 18 9 3 रोजी निधन झाले.

**रा.ग.गडकरी** 1 9 वर्ष वयात त्यांच्या उच्च माध्यमिक शाळेची शिक्षण पूर्ण केले. आणि पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालया मध्ये प्रवेश घेतला. तथापि गणित विषयात परीक्षा घेताना त्यांनी महाविद्यालयात पहिल्या वर्षाच्या शेवटी औपचारिक शिक्षणाचा त्याग केला व साहित्यिक स्वारस्य दाखवित असताना स्वतःला पाठिंबा देण्यासाठी शिक्षण सुरू केले.

1 9 वर्षापर्यंत ते मराठी बोलू शकले नाहीत त्यानंतर त्यांनी मराठी, संस्कृत आणि इंग्रजी साहित्याचा व्यापक अभ्यास केला. विशेषतः संस्कृत नाटककार कालिदास आणि भवभूति यांच्या नाटकांच्या कादंबरीचा त्यांनी अभ्यास केला.

गडकरी यांचे दोनदा लग्न झाले. त्यांची पहिली पत्नी सीताबाई सोडून गेली होती. काही समकालीन **प्रियजन** लोक त्यानुसार त्या,त्या वेळी सोडून गेले होते. त्यांची दुसरी पत्नी रमा त्यांच्यापेक्षा 17 वर्षापेक्षा लहान होती. परंतु हेही एक अतिशय आनंदी विवाह नाही. गडकरी जेव्हा निराशेचा उद्रेक जाणवत होता तेव्हा वाटले की तो वैवाहिक परम आनंदाने त्याच्या मार्गाने जात नाही.

### कीवर्ड

राम गणेश गडकरी यांनी मराठी शब्दसंपत्तीत अनेक नवीन व मोलाच्या शब्दांची भर घातली. जसे–

कौडकौतुक ,फराळ, सनद, खेटरान, क्लान, चुलखंड, बेमुर्वत, आडगी हाइकाला, डोळयांची भीडमुरवत, सर्ग.

### संशोधन समस्या–

मद्यपि जीवन कौटुंबिक जीवनास कसे व किती घातक असते हा प्रश्न समाजापुढे आहे हाच विषय प्रस्तूत रा.ग.गडकरी यांच्या ‘एकच प्याला’ लेखन साहित्यातून अभ्यास संशोधन करून दाखविले आहे.

हे संशोधन अभ्यास करीत असतांना राम गणेश गडकरी यांचा अल्पआयुष्य जीवनकाळ असल्याकारणाने नेमकी माहिती मिळण्यास काही अडचणी आल्या. मानवी जीवन,सुखी–आनंदी संसार, व्यसनामुळे कसे उद्वस्त होते हे दाखविले गेलेले आहे ‘एकच प्याला’ या साहित्य लेखनातून.

### अभ्यासाचे महत्व

रा.ग.गडकरीं चे लेखनसाहित्य हे केवळ मनोरंजनात्मक नसून समाजोपयोगी आहे.त्यांच्या प्रत्येक लेखनसाहित्यातून कुठले ना कुठले समाजमुल्य समाजावर बिंबविले गेलेले आहेत.

## साहित्यिक काम

35 वर्षांच्या त्यांच्या आयुष्यांत गडकरींनी चार पूर्ण नाटकं, तीन अपूर्ण नाटक, 150 कविता आणि काही विनोदी लेख सादर केले- (त्याच्या मृत्यूच्या दिवशी त्यांनी काही तासांपूर्वीच आपला नाटक भावबंधन लिहिला होता.) साहित्यिक समीक्षकांनी त्यांची सर्व कामे अतिशय उच्च क्षमतेच्या असल्याचे ठरविले आहेत.

ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर कालिदास नंतर कोणत्याही भारतीय भाषेत गडकरी महान कवी,नाटककार मानतात. त्याचप्रमाणे आणखी एक प्रमुख मराठी साहित्यिक आचार्य अत्रे यांनी मराठी साहित्यात गडकरी यांचे योगदान आणि विशेषतः मराठी नाटकाला सर्वोच्च क्रम म्हणून मानले ते किर्लोस्कर नाटक कंपनीशी संबंधित होते.

‘एकच प्याला’ ही एक गरीब एकनिष्ठ पत्नी सिंधू आणि तिच्या मद्यपी पती सुधाकर यांची कथा होती . ‘एकच प्याला’ नाटक म्हणजे मद्य पिण्याच्या सुधाकरच्या वैयक्तिक आणि वास्तविक अनुभवावर आधारित होता-

### अभ्यास उद्दिष्टे

रा.ग.गडकरी यांच्या प्रत्येक साहित्यलेखनाचा अभ्यास खूप महत्वपूर्ण आहे.

प्रत्येक साहित्यप्रकार हा मूल्यसंस्कारांशी संबधित आहेत. जसे नैतिकमुल्ये,कौटुंबिक मुल्ये, हास्यमुल्ये, सामाजिक मुल्ये इ.अनेक मुल्यांचे संस्कार मनुष्यावर होतात जेव्हा रा.ग.गडकरींचे साहित्य वाचले जाते.

- रा.ग.गडकरींनी लिहिलेली नाटके–
  - एकच प्याला
  - पुण्यप्रभाव
  - भावबंधन
  - प्रेमसंन्यास
  - राजसंन्यास
  - वेड्याचा बाजार
- रा.ग.गडकरींनी लिहिलेले काव्य–
  वाग्वैजयंती
- रा.ग.गडकरींनी लिहिलेले विनोदी लेखन –
  संपूर्ण बाळकराम

विनोदी लेखन




गडकऱ्यांचे विनोदी लेखन त्यांच्या संपूर्ण बाळकराम ह्या पुस्तकात एकत्रितपणे मिळते. नाट्यछटेपासून ते संवाद आणि विडंबनापर्यंत विविध प्रकारांतून गडकऱ्यांनी विनोद हाताळलेला दिसतो. त्याचे वर्णन करण्यापेक्षा तो विनोद वाचावा आणि आजच्या आधुनिक काळातही खदखदून हसावे असा मोह होणं स्वाभाविक आहे. संपूर्ण बाळकरामचे पान न पान खरोखरीच उच्च अभिरूचीच्या हास्यरसाची निर्मिती करणारे आहे.

## संशोधन कार्यप्रणाली

प्रस्तूत संशोधन कार्यकरत असतांना दुय्यम स्त्रोतांचा वापर केलेला आहे.

व्यक्तिगत प्रालेख व सार्वजनिक प्रालेख अशांचा उपयोग केला.

व्यक्तिगत प्रालेकांमध्ये आत्मचरित्रे,दैनंदिनी, पत्रे, संस्मरणे लेख इ. तर सार्वजनिक प्रालेखांमध्ये अभिलेख, वर्तमानपत्रे,साप्ताहिके,मासिके,वार्षिके विविध संघटनांची प्रकाशने,विशिष्ट वृत्त,सांख्यिकीय प्रकाशने इ.समावेश होतो.

## संशोधनासाठी काही
## रा.ग.गडकरींचे काही दुर्मिळ छायाचित्रे


गडकऱ्यांच्या हस्ताक्षराचा नमुना

### नमुनानिवड

राम गणेश गडकरी हे नाव नुसते उच्चारले तरी मराठी वाचकाला ‘गडकरी’ नावाचे जग समोर दिसू लागते. आजच्या आधुनिक युगातला एखादा शाळकरी विद्यार्थीही ‘एकच प्याला’, ’भावबंधन’ सारख्या नाटकांची नावे सहजपणे सांगून जातो. गडकरी गेले त्याला आता ८५ वर्षे उलटून गेली. साधारण:२५ वर्षांची एक पिढी असा हिशोब धरला तर गडक-यांच्या मृत्यूनंतर तीन पिढ्या उलटल्या आहेत. खरं तर एवढ्या काळात एखादा लेखक आणि त्याचे साहित्य केव्हाच विस्मरणात विरून नामशेष व्हायचे. पण गडक-यांचे साहित्य ह्या न्यायाला पुरून उरले. त्यांचे लेखन अगदी काल-परवाच झाले असावे असे वाटण्या इतपत ते ताजे आणि आजच्या बदलत्या संदर्भातही राम गणेश गडकरी या नावाचा उल्लेख ‘मराठी शेक्सपिअर’असा केला जातो.

## “एकच प्याला”






गडकरी लिखित एकच प्याला मधील एक प्रसंग...



एकच प्याला
गणपतराव बोडस
व बालगंधर्व : सुधाकर – सिंधू

## मंगलाचरण

(राग-भूप, ताल-झपताल. चाल- अमरवर नमित पद.)
शरण ते करुण तव नि:श्वसन व्यसनिघन।
नंदनंदन! जना पापकामा॥ हो॥ ध्रु.॥
कलहरत करि यदा मद्यमद यादवा।
सकल कुल कलि तदा ने विरामा॥
हानि ती पाहता दृष्टी बाष्पाकुला।
सृष्टी कष्टद तुला सौख्यधामा!॥ 1॥
कर्मरेखाबले धर्म नच मज कळे।
न स्मरत मतिही तव पुण्य नामा॥
रक्षणी मम तरिही दक्ष राहूनि सदा।
अक्षय स्वपदि पद देह रामा॥ 2॥





गडकरी यांच्या एकच प्याला नाटकात सुधाकर – गणपतराव बोडस, रामलाल – पंढरपूरकर बोवा,
सिंधू–नटसम्राट बालगंधर्व व शरद – मास्तर कृष्णराव फुलम्ब्रीकर

(चाल- विडा घ्या हो नारायणा.)
घास घेरे तान्ह्या बाळा। गोविंदा गोपाळा।
भरवी यशोदामाई। सावळा नंदबाळ घेई॥ ध्रु.॥
घेई कोंडा-कणी त्रैलोक्याचा धणी।
विदुरावरीचा। पहिलावहिला घास॥ 1॥
पोहे मूठभरी। क्षीराब्धीच्या हरी।
मैत्र सुदामजीचा । आला दुसरा घास॥ 2॥
थाली एक्या देठी। घ्यावी जगजेठी।
द्रौपदीमाईचा। आला तिसरा घास॥ 3॥
उरल्या उष्टावळी। फळांच्या वनमाळी।
शबरीभिल्लिणीचा। घ्या हो चवथा घास॥ 4॥
टाकू ओवाळून। मुखचंद्रावरून।
गोविंदाग्रजाचा। उरलासुरला घास॥ 5॥



गडकऱ्यांचे निधन झाले ते सावनेर येथील घर..

## रा.ग.गडकरींचे अन्य साहित्य

नाटके, काव्य आणि विनोदी लेखन ह्या तीन मुख्य प्रकारांच्या बाहेर वर्गीकरण करावे लागेल असे लेखन अन्य साहित्य ह्या विभागात समाविष्ट केले आहे.

चिमुकली इसापनिती हे गडकर्यांचे सर्वांत छोटे म्हणजे जेमतेम १० पानांचे पुस्तक बालकांसाठी आहे.

त्यात मुलांसाठी इसापनितीतल्या गोष्टी गडक-यांनी लिहील्या आहेत. त्या गोष्टींचं वैशिष्ट्य म्हणजे गडक-यांनी जाणीवपूर्वक एकही जोडाक्षर आपल्या ह्या लिखाणात येऊ दिलेलं नाही.

गडक-यांनी काही स्फुट लेख लिहीलेले आहेत. गडकर्यांनी आपले गुरू श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांना लिहीलेले पत्रही आहेत.

## संशोधन अभिप्राय

मद्यपि जीवन मनुष्याच्या आयुष्याची राख करते. हे प्रस्तुत रा.ग.गडकरी यांच्या साहित्य लेखनावरून कळते. संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील तरूण व वैवाहिक कुटुंबाला याची जाणीव आहे मद्यपि जीवनापासून दूर राहणे हे स्वतःच्या वैयक्तिक व पारिवारीक कुटुंबासाठी आवश्यक आहे. प्रत्येकाला आपली ओळख स्वतःला असली म्हणजे कार्य सफलतेकडे जाण्याची पहिली पायरी असं म्हणयला हरकत नाही.

## निष्कर्ष

**वरिल साहित्य लेखनावरून असे कळते की, "विनाश काले, विपरित बुध्दि."सर्वच माणसांना परमेश्वरांनी चांगली सद्बुध्दि दिलेलो असते पण मानवी परिस्थिती इतकी भयानक असते की माणूस स्वतःवरचाच ताबा हरवून बसतो.व वाईट मार्गी लागून आयुष्य घालवुन बसतो.**

## संदर्भ

१. गडकर्यांच्या साहित्यविषयीचीअभ्यासकांनाउपयोगी पडू शकेल अशी सूची गर्वनिर्वाण (वि. ना. कोठीवाले यांनी पूर्ण केलेले); मुंबई, परचुरे पुराणिक आणि मंडळी.

2. वेडयांचा बाजार (अंक १-३) अपूर्ण.

3. प्रेमसंन्यास, १९१३

4. पुण्यप्रभाव, १९१६

5. राजसंन्यास, १९१६-१७ अपूर्ण. (अंक १, प्रवेश १-२, अंक ३, प्रवेश १, अंक ५, प्रवेश १-५)

एकच प्याला, १९१७

भावबंधन, १९१९

संपूर्ण बाळकराम, १९२५.

- वाग्वैजयंती, १९२१.

अप्रकाशित गडकरी - संपादक प्र. के. अत्रे; मुंबई, मोटे, १९६२

निवडक संदर्भ - ग्रंथ

मासिकांतीलसंदर्भ लेख